# प्रकरण दुसरे

# समाजवादी पक्ष व त्यामधील त्यांचा सक्रिय सहभाग

प्रकरण २ रे

# समाजवादी पक्ष व त्यामधील त्यांचा सक्रिय सहभाग

**प्रस्तावना :**

ना. ग. गोरे हे जेष्ठ समाजवादी विचारांचे नेते होते. ना. ग. गोरे हे थोर स्वातंत्र्यसेनानी, तत्वचिंत्तक आणि सामाजिक परिवर्तनवादी नेते होते. ना. ग. गोरे समाजवादी विचारवंत म्हणून प्रसिध्द असले तरी विशिष्ट मर्यादेपलिकडे पहायचंच नाही, असा त्यांचा आग्रह नाही. त्यांच अवघं जीवन एक समर्पित, धगधगतं अग्निकुंड होतं.

सांस्कृतिक आणि राजकीय विचारांची बदलती वळणंही त्यांनी पाहिली. अभ्यासूवृत्ती, साहित्याची आवड आणि अभिजात रसिकता यांचा त्रिवेणी संगम ना.ग. गोरे यांच्या व्यक्तिमत्त्वात होता, त्यामुळे त्यांचे जीवन सर्वस्पर्शी झालं. राजकीय नेता, चळवळीतील कार्यकर्ता, सजग विचारवंत, ओजस्विता, समाजाविषयी कणव असलेला समाजप्रबोधक अशा कितीतरी रूपांमधून ना. ग. गोरे दिसतात. ही प्रत्येक भूमिका त्यांनी समरसून केली. एक साहित्यिक म्हणूनही त्यांचे स्थान अजोड आहे. त्यांच्या प्रत्येक लेखातून वैचारिक भूमिका त्यांनी सुस्पष्टपणे मांडली आहे.

ना. ग. गोरे यांनी समाज परिवर्तनासाठी आयुष्यभर परिश्रम केले. ना. ग. गोरे निखळ बुध्दिप्रामाण्यवादी होते. ना. ग. गोरेंचा विरोध बेगडी अंधश्रध्देला होता. श्रध्देला त्यांचा विरोध नव्हता. उदात्त जीवनमूल्यांच्या श्रध्देच्या पोटीच तर ना. ग. गोरेंनी राजकीय आणि सामाजिक क्षेत्रांतील अनेक लढे उभारले.

राजकीय आघाडीवरचे एक प्रभावी नेते म्हणून ना. ग. गोरेंची ख्याती होती. समाजवादी आंदोलनाला आशय आणि आकार देण्याच्या कामात ना. ग. गोरेंचा मोठा वाटा होता. समाजवादी चळवळीच्या पायाभरणीस त्यांनी कारागृहाच्या भिंतीआड सुरूवात केली, परंतु त्यांची समाजवादी निष्ठा मात्र पोथीनिष्ठ न राहता बदलत्या काळाशी इमान राखणारी एक गतिमान निष्ठा होती. स्वातंत्र्यसैनिक, राजकारणी, साहित्यिक, समाजवादी विचारवंत अशा अनेक भूमिकेत समाज त्यांना ओळखत होता.

ना. ग. गोरे हे समाजवादी विचारवंत होते परंतु त्यांचा समाजवाद हा आगरकरांच्या बुध्दि-प्रामाण्यवादावर आणि मार्क्सच्या भौतिकवादी आर्थिक समतेवर उभा होता. त्याला गांधीजींच्या अहिंसावादाची जोड होती तर फुले, आंबेडकर यांच्या सामाजिक समतेचा आधार होता. या वैचारिक पायावर त्यांची समाजवादी विचारसरणी आकारास आली. त्यामुळेच समाजकारण आणि राजकारण या गोष्टी एकमेकास पुरक असाव्यात असा त्यांचा आग्रह होता.

**समाजवादी पक्ष :**

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय राजकारणावर जगातील घडामोडींचे परिणाम होत होते. १९१७ च्या रशियन राज्यक्रांतीनंतर लोकमान्य टिळकांनीही या घटनेची दखल घेतली होती. रशियन राज्यक्रांतीचा नेता लेनिन यांच्या सहकाऱ्यांमध्ये एम.एन.रॉयही होते. त्यांनी प्रथम कम्युनिस्ट विचारसरणी मांडणारे साहित्य भारतात पाठविले. मुंबईला कामगार चळवळीत कार्य करणारे श्रीपाद अमृत डांगे आणि जोगळेकर, निंबकर आदी त्यांचे सहकारी यांच्यापर्यंत हे साहीत्य पाहोचले आणि त्यांच्यामुळेच भारतात 'कम्युनिस्ट विचारांचे' बीजारोपण झाले. १९२५ मध्ये

भारतीय 'कम्युनिस्ट पक्षाची' स्थापना झाली. 'कम्युनिस्ट पक्षांवर' बंदी होती, त्यामुळे त्यांचे कार्य गुप्तपणे चालत असे. कम्युनिस्ट पक्ष स्वातंत्र्यलढ्यापासून दूर राहिला. कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनी गांधीजींच्या विरोधी निदर्शने करून चळवळीस विरोध केला.

रशियन राज्यक्रांतीवर जगातील अनेक तरूण कार्यकर्त्याप्रमाणे भारतातील काही तरूण कार्यकर्त्यांच्यावर मार्क्सवादी विचारांचा प्रभाव पडला होता. जयप्रकाश नारायण हे अमेरिकेत विद्यार्थी म्हणून शिकत असताना त्यांनी मार्क्सवादी साहित्य वाचले आणि मार्क्सच्या विचारांनी ते प्रभावित झाले. १९३२ च्या चळवळीत जयप्रकाश नारायण यांना मद्रासमध्ये अटक झाली आणि एक वर्ष शिक्षा होऊन त्यांना नाशिक तुरूंगात पाठविण्यात आले. नाशिकच्या तुरूंगात त्यांच्याबरोबर युसूफ मेहेरअली, अशोक मेहता, मिनू मसानी, ना.ग.गोरे, अच्युतराव पटवर्धन वगैरे अनेक तरूण कार्यकर्ते होते. जयप्रकाश नारायण यांना आणि या सर्व तरूणांना गांधीजींच्या बद्दल आदर वाटत असला तरी गांधीजींच्या काही धोरणांवर ते टीका करीत होते. गांधीजी 'सत्य आणि अहिंसा' हे जीवनाचे तत्त्वज्ञान मानीत होते. ही भूमिका स्वातंत्र्य चळवळीला घेता येणार नाही असे जयप्रकाशजी आणि त्यांच्या या तरूण सहकाऱ्यांचे मत होते. भगतसिंग आणि इतर क्रांतिकारकांच्या जीवनाचा आणि बलिदानाचा त्यांच्यावर मोठा प्रभाव होता. या तरूण कार्यकर्त्यांपैकी जयप्रकाश नारायण आणि अन्य काही जणांनी मार्क्सचे विचार आणि रशियन राज्यक्रांती विषयक साहित्य तुरूगांत येण्यापूर्वीच वाचले होते. काहीजणांनी हे ग्रंथ येथे वाचले. रशियात झालेल्या कामगार क्रांतीमुळे नाशिक आणि येरवडा तुरूंगातील हे तरूण कार्यकर्ते प्रभावित झाले होते. मार्क्सचे विचार वाचल्यानंतर रशियातील राज्यक्रांतीचे वैचारिक अधिष्ठान काय होते आणि जगातील सर्व श्रमिकांना समतेवर आधारलेले

नवे जग निर्माण करण्याची प्रेरणा मार्क्सच्या विचारांतून कशी मिळत होती हे या तरूण कार्यकर्त्यांना उमगले. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यालाही या विचारांच्या आधारे समतावादी स्वरूप कसे देता येईल, यासंबधी जयप्रकाश नारायण आणि मेहेरअली, मसानी, अच्युतराव पटवर्धन, ना. ग. गोरे आदी कार्यकर्ते यांच्यामध्ये दीर्घकाल विचारमंथन झाले. भारतीय जनतेत हिंदु-मुसलमान, दलित-दलितेतर यांच्यामध्ये जे काही मतभेद होते, त्यांच्या आधारे भारतीय समाजात फूट पाडून येथील ब्रिटीश साम्राज्य खंबीर करणारी ही कुटील राजनीती ब्रिटीश सरकारने अवलंबिली होती. या फूट पाडणाऱ्या धोरणामुळे भारतीयांच्यात जी दुही निर्माण झाली होती, तिच्यावर मात करण्यासाठी मार्क्सने पुरस्कारलेली वर्गीय लढ्याची भूमिका आवश्यक आहे, असे सर्व कार्यकर्त्यांना वाटत होते. १

भारतात साम्यवादी व समाजवादी विचारप्रवाह पश्चिमेकडून आले. रशियांत साम्यवादी क्रांती झाल्यानंतर या विचारांचे आकर्षण अधिक वाढले इ. सन १९२४ मध्ये भारतात साम्यवादी पक्षाची (कम्युनिस्ट पार्टी) स्थापना झाली. साम्यवादी पक्ष हा आंतरराष्ट्रीय साम्यवादी संघटनेला जोडलेला होता. रशियाचे नेतृत्व त्याला मान्य होते व रशियाच्या आदेशांप्रमाणे आपले भारतातील धोरण बदलत राहण्याची त्याची तयारी होती. साम्यवाद व रशिया या दोहोविषयी कुतूहल, कौतुक व आदर असणारा तरूणांचा दुसराही एक वर्ग होता. रशियांत घडणारी प्रत्येक गोष्ट या लोकांना मान्य होती असे नव्हे; परंतु रशियन क्रांतीचा प्रभाव या लोकांच्या मनावरही पडला होता. भारतात यावेळी काँग्रेसच्या नेतृत्वाखाली चालू असलेल्या राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीचे प्रखर आवाहनही या तरूणांना आकर्षित करीत होते. या वर्गाला राष्ट्रीय स्वातंत्र्य हवे होते, आर्थिक समता हवी होती व आपले धोरण रशियासारख्या एखाद्या साम्यवादी विचारसरणीच्या का होईना; परंतु परकिय राष्ट्राकडून ठरवले जावे हे या

लोकांना मान्य होण्यासारखे नव्हते. या लोकांच्या प्रयत्नातूनच भारतीय समाजवादाचा विकास झालेला आहे.

राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या आकांक्षेने प्रेरित होऊन समाजवादी विचारसरणीचे हे लोक काँग्रेसमध्येच सामील झालेले होते. त्यावेळी या वर्गांचे वैचारिक नेतृत्व जवाहरलाल नेहरू यांच्याकडे होते. १९३२ च्या सत्याग्रहाच्या चळवळीत जयप्रकाश नारायण, मिनू मसानी, अच्युतराव पटवर्धन, अशोक मेहता इत्यादी समाजवादी विचारसरणीची मंडळी नाशिक येथील तुरूंगवासात एकत्र ठेवली. याठिकाणी अखिल देशांत काँग्रेसमध्ये राहून काम करणाऱ्या काँग्रेस समाजवादी पक्षाची स्थापना करणाऱ्या कल्पनेचा उदय झाला. २

ना.ग.गोरेंचा १९३२ चा कारावास हा पहिल्या कारावासापेक्षा कमी खडतर होता. या कारावासामध्ये सक्त मजुरीची शिक्षा नसल्यामुळे वाचन करायला भरपूर फुरसद होती. नाशिकच्या तुरूंगात जयप्रकाश नारायण, युसूफ मेहेरअली, अच्युतराव पटवर्धन आदींच्या बरोबर ना.ग. गोरे ही होते. ना. ग. गोरेंनी येथेचे 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' हा ग्रंथ वाचला. एंगल्सचे ''युरोपियन ॲण्ड सायंटिफिक सोशालिझम्'' आणि मार्क्स, लेनिन यांचे अन्य साहित्यही वाचले. स्वातंत्र्य हे श्रमिकांसाठी, शेतकरी आणि कामगारांसाठीच असले पाहीजे. यावर यांच्यात एकमत होते. ना.ग.गोरेंनी मार्क्स एंगल्स यांचे ग्रंथ जरी नाशिक तुरूंगात प्रथम वाचले तरी 'यूथ लीग' मध्ये काम करीत असताना त्यांना साम्यवादी विचार स्थूलपणाने माहीत होते. या विचारसरणीचे कॉ. डांगे आदी कार्यकर्ते मुंबईत जी ट्रेड युनियन चळवळ चालवीत, तिच्याशी ना. ग. गोरेंचा प्रत्यक्ष संबध नसला तरी 'ट्रेड युनियन' ही कामगारांच्या हक्कांसाठी व हितासाठी चळवळ करते हे त्यांना माहीत होते. डांगे,

जोगळेकर, निंबकर यांना पकडून सरकारने जेव्हा त्यांच्यावर मीरत कटाचा खटला भरला, तेव्हा 'यूथ लीग' मधील तरूण कार्यकर्त्यांना त्यांच्याबद्दल मोठा आदर वाटला. परंतु १९३० च्या स्वातंत्र्य चळवळीला रणदिवे आदी कम्युनिस्टांनी विरोध केला, त्यावेळीं मात्र 'यूथ लीग' मधील कार्यकर्ते त्यांच्यावर फार नाराज झाले. ना.ग. गोरेंना समाजवादाबद्दल आकर्षण वाटत होते. परंतु स्वातंत्र्याच्या चळवळीला अग्रक्रम दिला पाहीजे, असा त्यांचा आग्रह होता. गांधीजींचे सर्व विचार त्यांना पटत होते असे नाही. परंतु देशव्यापी आंदोलन सुरू करण्याचे अणि सामान्य माणसाला स्वातंत्र्य चळवळीत सहभागी करून घेण्याचे अपार सामर्थ्य गांधीजींच्या चळवळीत आहे याची जाणीव ना.ग.गोरे यांना होती. सुभाषचंद्र बोस सारख्या जहाल विचारांच्या पुढाऱ्यांचे त्यांना मोठे आकर्षण वाटत असे. भारतातील चळवळीची सूत्रे कोणत्याही आंतरराष्ट्रीय संघटनेच्या हाती असता कामा नयेत असेही त्यांना वाटत होते. भारतातील स्वातंत्र्य चळवळीत समाजवादी आशय आणण्यासाठी जी संघटना उभी करावी लागेल आणि जे आंदोलन करावे लागेल त्यांची सर्व सूत्रे भारतीयांच्याच हाती असली पाहिजेत अशी ना. ग. गोरे आणि त्यांच्या समविचारी सहकाऱ्यांची धारणा होती. त्यामुळे भारताच्या स्वातंत्र्यलढ्यालाच अग्रक्रम द्यावयाचा आणि त्या लढ्याचे नेतृत्व करणाऱ्या काँग्रेसमध्ये राहूनच समाजवादी विचारांचा प्रभाव स्वातंत्र्य आंदोलनावर पडावा, यासाठी एकजुटीने प्रयत्न करावयाचे असा निर्णय त्यांनी घेतला. ३

ना. ग. गोरे १९३२ साली नाशिकच्या तुरुंगात होते. ना. ग. गोरेंचे नाशिकच्या तुरुंगातील वास्तव्य हे ऐतिहासिक ठरले. कारण ह्याच कारागृहात जयप्रकाश नारायण, एस. एम., मिनू मसानी, अशोक मेहता आदींच्या सहवासात

त्यांनी काँग्रेस समाजवादी पक्षाची मुहूर्तमेढ रोवण्याचे ठरविले भारतामधील काँग्रेस पक्ष हा रुढ अर्थाने राज कीय पक्ष नसून साम्राज्यवादाशी झुंज देणारी ती एक व्यापक रार्ष्ट्रीय आघाडी आहे, ह्या आघाडीमध्येच राहून समाजवादाशी बांधिलकी असणाऱ्या समाजवादी पक्षाची स्थापना करणे आवश्यक आहे, ही ना. ग. गोरे आणि नाशिकच्या कारागृहातील त्यांच्या सहकाऱ्यांची धारणा होती. काँग्रेसकडे हळूहळू सनदशीर राजकारणाचा कल आणि तडजोड वादी भूमिका वाढत होती. ह्या भूमिकेस विरोध करून साम्राज्य विरोधी संघर्ष प्रखर करण्यासाठी प्रयत्नशील राहणे अणि समाजवादी विचारसरणीचा प्रचार करणे आणि प्रभाव वाढविणे यासाठीच ना. ग. गोरेंनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी काँग्रेस समाजवादी पक्षाच्या स्थापनेची योजना आखली. नाशिकच्या तुरुंगातून सुटका होताच ह्या योजनेस मूर्त स्वरूप देण्यासाठी १९३४ साली काँग्रेस समाजवादी पक्षाची स्थापना परिषद झाली ह्या स्थापना परिषदेमध्ये ना. ग. गोरेंचा सक्रिय सहभाग होता. त्या काळात समाजवादाचा नामोच्चार करण्यासही काँग्रेसजन धजत नसत त्या प्रतिकूल परिस्थितीमध्येही ना. ग. गोरेंनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी समाजवादाचे व्रत स्वीकारले. त्यासाठी वर्गसंघटना उभारल्या, संघर्ष केले, देहदंड सोसले. ४

भारताचे प्रश्न समाजवादाच्या मार्गानेच सुटतील अशी समाजवाद्यांची खात्री होती. भारतीय जनतेचे दारिद्रय, बेकारी आणि पारतंत्र्य याचा निरास करण्याचा समाजवाद हा एकच मार्ग आहे अशी त्यांची धारणा होती. यासाठी त्यांना सामाजिक आणि आर्थिक व्यवस्थेत मोठे क्रांतीकारक बदल घडवून आणावे लागणार होते. याच वैचारिक अधिष्ठानातून काँग्रेस समाजवादी पक्षाची स्थापना झाली, त्यावेळी या पक्षाचा कार्यक्रम पुढीलप्रमाणे जाहीर करण्यात आला.

१) श्रमिकांच्या हाती सर्व सत्ता देण्यात येईल.

२) आर्थिक विकासासाठी नियोजन करण्यात येईल व त्यावर सरकारचे नियंत्रण असेल.

३) लोखंड, कापड, तागाचे कापड, रेल्वे, जलवहातूक, चहा, कॉफी वगैरेचे मळे, खाणी, बँका, विमा, व्यवसाय यांचे राष्ट्रीयीकरण करण्यात येईल.

४) आंतरराष्ट्रीय व्यापार संपूर्णपणे सरकारच्या हाती असेल.

५) खाजगी अर्थक्षेत्रांत सहकारी संस्थांचा प्रसार.

६) संस्थानिक, जमीनदार व इतर शोषण करणाऱ्या वर्गांना दूर करण्यात येईल व त्यांना कोणताही मोबदला देण्यात येणार नाही.

७) जमिनोचे कृषिकांना फेरवाटप करण्यात येईल.

८) सहकारी व सामुहिक शेतीला सरकार उत्तेजन देईल व त्यांचा प्रसार करील.

९) शेतकरी व मजूर यांच्या शिरावर असणारा कर्जाचा बोजा दूर करण्यात येईल.

१०) प्रत्येकाला काम मिळवून देणे किंवा त्यांच्या निर्वाहाची सोय करणे ही सरकारची जबाबदारी राहील.

११) प्रत्येकाने आपल्या कुवतीप्रमाणे काम केले पाहिजे. व प्रत्येकाला त्याच्या गरजेप्रमाणे दाम मिळाले पाहिजे. हे समाजातील उत्पादन व विभाजन व्यवस्थेच्या मागील सूत्र असेल.

१२) प्रत्येकाला वयात आलेल्या नागरिकाला मतदानाचा अधिकार असेल.

१३) जाति व धर्म यावर आधारलेल्या भेदांना मान्यता मिळणार नाही. सरकार कोणत्याही धर्माचे पक्षपाती असणार नाही.

१४) स्त्री-पुरूष समानता राहिल.

१५) भारताचे राष्ट्रीय कर्ज म्हणून असलेली रक्कम परत करण्याची जबाबदारी स्वीकारण्यात येणार नाही.

ही सूत्रे परकीयांच्या व स्वकीयांच्या शोषणाला विरोध करणारी आहेत. समानतेचा आग्रह धरणारी आहेत. मार्क्सवादी पध्दतीने विचार करणारी आहेत. मार्क्स व लेनिन या दोघांच्याहि विचारांची छाया या सूत्रांवर आहे. मार्क्सवादच साम्राज्यशाहीच्या विरूध्द लढणाऱ्या शक्तींना मार्गदर्शन करू शकेल, म्हणून पक्षाच्या सभासदांनी वर्गकलहाचे स्वरूप कसे असते, राज्यसंस्थेचे स्वरूप कोणते असते, समाजवादी अर्थव्यवस्था शेवटी कशी अस्तित्वात येते, या मार्क्सप्रणीत क्रांतीशास्त्राचा नीट अभ्यास केला पाहीजे, असे त्यांना सांगण्यात आले. जयप्रकाश नारायण यांची या काळात स्पष्टपणे मार्क्सवादी भूमिका होती. ना.ग.गोरे व त्यांचे सहकारीही या भूमिकेशी सहमत होते. सामाजिक आर्थिक समता निर्माण होण्यासाठी समाजवादी पक्षाच्या स्थापनेत त्यांनी पुढाकार घेतला. ५

१९३०-३२ च्या आंदोलनात नाशिकला ज्या प्रमाणे जयप्रकाश नारायण, अच्युतराव पटवर्धन, मेहेरअली, गोरे आदी तरूण कार्यकर्ते समाजवादी विचारांकडे आकृष्ट झाले होते, त्याचप्रमाणे संयुक्त प्रांत आणि बिहारमधील तरूण कार्यकर्त्यांमध्येही असा विचार करणारा एक मोठा गट होता. संयुक्त प्रातांतील विद्यार्थ्यांचे प्रेरणास्थान काशी विद्यापीठाचे कुलगुरू आणि बौध्द धर्म व इतिहासाचा गाढ व्यासंग केलेले विद्वान आचार्य नरेंद्र देव हे होते. आचार्य नरेंद्र देव हे विचाराने मार्क्सवादी होते. भारताचे स्वातंत्र्य हे शेतकरी आणि कामगारांसाठीच असले पाहीजे आणि त्यासाठी स्वातंत्र्य चळवळीला समाजवादी विचारांची व चळवळीची जोड

दिली पाहीजे, अशी त्यांची भूमिका होती. परंतु स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच समाजवादाचे स्वप्न साकार करता येईल असे त्यांना वाटत होते.

संयुक्त प्रांतातील मोहनलाल गौतम आणि संपूर्णानंद आणि बिहारमधील पाटणा जेलमध्ये असलेले गंगाशरण सिंह, रामवृक्ष बेनीपुरी, वगैरे तरूणही समाजवादी विचारांच्या प्रभावाखाली आले होते. १९३२ सालच्या तुरूंगातून सुटल्यावर भारतातील हे समाजवादी विचारांचे तरूण एकत्र येऊ लागले. पाटण्यास १७ मे १९३४ रोजी 'अखिल भारतीय काँग्रेस कमिटीची' बैठक भरणार होती. त्यापूर्वी आचार्य नरेंद्र देव यांच्या अध्यक्षतेखाली उत्तर भारतातील समाजवादी तरूणांची बैठक झाली आणि काँग्रेस समाजवादी पक्षाची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला. पुण्याला १ जुलैला अशीच बैठक एस.एम.जोशी आणि ना.ग.गोरे यांनी घेतली व तेथेही ह्याच निर्णय झाला. १९३४ च्या ऑक्टोबर महिन्यांत मुंबई येथे देशभरातील प्रमुख समाजवादी कार्यकर्ते एकत्र आले आणि तेथेच काँग्रेस समाजवादी पक्षाची स्थापना करून त्याचे पहिले संमेलन घेण्यात आले. काँग्रेस समाजवादी पक्षाचे अध्यक्ष म्हणून आचार्य नरेंद्र देव आणि सरचिटणीस म्हणून जयप्रकाश नारायण यांची नियुक्ती करण्यात आली. काँग्रेस समाजवादी पक्षाच्या संस्थापक सदस्यांमध्ये आचार्य नरेंद्र देव, जयप्रकाश नारायण, डॉ. राममनोहर लोहीया, युसूफ मेहेरअली, अच्युतराव पटवर्धन, कमलादेवी चट्टोपाध्याय, एस.एम.जोशी, ना.ग.गोरे आणि मिनू मसानी आदी प्रमुख कार्यकर्ते होते. ६

## ना. ग. गोरे यांचा समाजवादी पक्षामधील सहभाग -

काँग्रेस समाजवादी पक्षाची रितसर स्थापना होण्याआधी एक वर्ष बिहारमध्ये बिहार समाजवादी पक्षाची स्थापना झाली होती. पक्ष स्थापनेच्या कार्यासाठी तेथेच

एक पूर्वतयारी समिती नियुक्त करण्यात आली. या समितीने देशाच्या निरनिराळ्या प्रांतात दौरे करून काँग्रेस अंतर्गत समाजवादी पक्ष स्थापन करणे का आवश्यक आहे हे समजावून दिले.

श्रमजीवी किसान कामगार आणि त्यांच्या श्रमांची चोरी करणारे जमीनदार आणि भांडवलदार यांच्यामध्ये असणारा विरोध लक्षात घेऊन, श्रमजीवींची संघटना केली पाहीजे ती केल्याशिवाय साम्राज्यविरोधी चळवळ, म्हणजेच राष्ट्रवादाची चळवळ प्रभावी होऊ शकत नाही हे सूत्र घेऊन सर्व कार्यकर्त्यांनी काँग्रेस अंतर्गत समाजवादी पक्ष स्थापन केला. ७

जबाबदार राज्यपद्धती असावी, समाजहिताचे व आर्थिक व्यवहारात हस्तक्षेप करणारे कायदे व्हावेत, राज्य चालवणारे यांना सर्व जनतेने निवडून द्यावे, मतदानाचा अधिकार सर्व प्रौढ स्त्री पुरूषांना असावा, उत्पन्नाची किंवा संपत्तीची मर्यादा त्यासाठी असू नये असे प्रतिपादन समाजवादी करत होते. त्या विचारांच्या मागे जनशक्ती संघटित करण्यासाठी आंदोलने केली जात होती. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत प्रकट झालेले दोष दूर करण्यासाठी कामगारांना संरक्षण देणारे कायदे सरकारने करावेत यावर लोकशाही समाजवाद्यांचा भर होता. या सर्व विचारांतून लोकशाही समाजवादी चळवळीचा उगम झाला. ८

ना. ग. गोरे हे १९३२ च्या चळवळीत नाशिक तुरूंगात असताना मार्क्स आणि समाजवादावरील अन्य ग्रंथ वाचले आणि ते समाजवादी विचारांकडे ओढले गेले. जयप्रकाश नारायण, डॉ.लोहिया, एस.एम.जोशी आदींच्या समवेत त्यांनी काँग्रेस समाजवादी पक्षाच्या स्थापनेत पुढाकार घेतला. ना.ग.गोरेंच्या राजकिय जीवनातील हा महत्त्वाचा टप्पा होता.

दुसरे महायुध्द सुरू झाले तेव्हा युध्दविरोधी भूमिका घेतानाच काँग्रेसने जनआंदोलन सुरू करावे अशी भूमिका काँग्रेस समाजवादी पक्षाने घेतली. गांधीजीच्या वैयक्तिक सत्याग्रहात न जाण्याचे ना. ग. गोरेंनी ठरविले. त्यामुळे त्यांच्यावर काही जणांनी टीका केली त्यावेळी ते म्हणाले, 'मी तुरूंगात जायला भीत नाही, परंतु आता देशव्यापी चळवळ करण्याची वेळ असताना प्रतीकात्मक, सत्याग्रहात भाग घेणे माझ्या मनाला पटत नाही.' ९

याच वेळी महाराष्ट्रात राष्ट्रीय स्वयंसेवक व अन्य हिंदुत्ववादी मंडळींनी आक्रमक भूमिका घेण्यास सुरूवात केली हे आव्हान स्वीकारण्यासाठी राष्ट्रसेवा दलाची स्थापना करून तरूणांना राष्ट्रीय स्वातंत्र्य लढ्यासाठी शिक्षण द्यावे असा निर्णय एका बैठकीत घेण्यात आला. ना.ग.गोरे आणि शिरूभाऊ लिमये यांनी या बाबतीत पुढाकार घेतला. ना. ग. गोरेंच्या मते, जातीयवादी शक्तींना तोंड देताना केवळ त्यांच्यावर टीका करून चालणार नाही. तरूणांना स्वातंत्र्य लढ्यात येण्यासाठी प्रवृत्त केले पाहीजे. देशहीत हे स्वातंत्र्यासाठी लढण्यात आहे; आपसांत मारामाऱ्या करण्यात नाही, हे नव्या पिढीला पटेल. राष्ट्रसेवा दल या युवक संघटनेत पुरोगामी विचारांचा संस्कार तरूणांवर करून त्यांना आपण राष्ट्रीय चळवळीत आणू असा त्यांना विश्वास वाटतो.

१९४७ साली स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळीच देशाची फाळणी झाली. त्यावेळी समाजवादी पक्षाने फाळणीस विरोध केला. या संदर्भात ना.ग.गोरे यांच्या मते, जयप्रकाश नारायण आणि डॉ. लोहिया यांनी समाजवादी पक्षाची भूमिका मांडली परंतु राजकारणात केवळ भूमिका मांडणे हे पुरेसे नसते. ती भूमिका देशात मान्य होण्यासाठी झगडावे लागते. त्यासाठी पक्षांकडे संघटनात्मक बांधणी आवश्यक

असते. पक्षाची भूमिका सामान्य जनतेपर्यंत नेहून पोचवणारी तरूण निष्ठावान कार्यकर्त्यांची फौज लागते. या बाबतीत समाजवादी पक्षातील सर्व कार्यकर्ते अपुरे पडले. १०

स्वातंत्र्यसंग्रामाच्या काळात नामवंत राष्ट्रीय नेत्यांनी इंग्रजी भाषेतून लिहिलेले साहित्य, त्याचप्रमाणे समाजवादी साहीत्य हे सामान्य मराठी वाचकांपर्यंत त्यांच्या प्रबोधनासाठी पोहोचावे ह्या उद्देशाने ना. ग. गोरेंनी संबंधित इंग्रजी ग्रंथाचा अनुवाद 'खंडित भारत' पंडीत नेहरूंच्या आत्मचरित्राचा अनुवाद, जय प्रकाशांच्या इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद 'समाजवादच का ?' आणि वादविवेचन मालेतर्फे प्रकाशित झालेली पुस्तके 'विश्वकुटुंबवाद', 'लोकशाही' ही ना. ग. गोरेंनी महाराष्ट्रातील राजकीय कार्यकर्त्यांच्या प्रशिक्षणासाठी पुरविलेली राजकीय शिदोरीच होती. अशा प्रकारे समाजवादी चळवळीला आणि कार्यकर्त्यांना वैचारिक खाद्य पुरविण्याचे मोठे कार्य ना. ग. गोरे यांनी केले. त्यांच्या विचारांना राजकीय क्रियाशीलतेची व समाजवादी सक्रियतेची जोड होती. म्हणून त्यांचे समाजवादी विषयावरील लिखाण हे कार्यकर्त्यांना समाजवादाची दिशा देणारे ठरले.

१९४२ च्या आंदोलनानंतर समाजवाद्यांनी 'ऑगस्टवादी' गट म्हणून कार्य करावे आणि १९४२ च्या भूमिगत आंदोलनातील बिगर समाजवाद्यांचे सहकार्य संपादन करावे की समाजवादी पक्षाचे पुनर्वसन करावे ह्यावर बरीच चर्चा झाली. आचार्य नरेंद्रदेवांनी समाजवादी पक्षाच्याच पुन:संघटनेचा आग्रह धरला. ना. ग. गोरेंनी आचार्य नरेंद्रदेवांच्या विचारांना साथ दिली. ११

ना. ग. गोरे १९४२ च्या आंदोलनात सहभागी झाले होते. तेंव्हा ते भूमिगत असतांना त्यांना अटक झाली होती. ते १९४६ मध्ये सुटले. तुरूंगातून

सुटल्यानंतर राष्ट्रसेवादलाच्या शिबिरात किंवा अभ्यासवर्गात ना. ग. गोरेंची नेहमी बौध्दिके होत असत. तरूणांच्या मनावर समाजवादी विचार बिंबवण्याचे कार्य ते करत होते. त्यावेळच्या तरूणांना कट्टर लोकशाहीनिष्ठ समाजवादी बनविण्याचे फार मोठे श्रेय ना. ग. गोरे यांनी घेतले आहे. त्याकाळी लोकशाही समाजवाद आणि समाजवादी लोकशाही हा बुध्दिभेदी घोळ फार जोरात चालत असे. या दोन शब्दांचा नवागतांना यथार्थ अर्थबोध त्यांनी करून दिला. राज्यकारभार लोकांच्या इच्छेनुसार व संमतीने चालावा, त्यासाठी व्यक्तिनिरपेक्ष संस्था असाव्यात, लोकांना आपली इच्छा मतदानाद्वारे प्रकट करता यावी, तसेच वेळोवेळी आपले मत सांगता यावे, लेखी लिहिता व छापता यावे आणि संघटितरित्या ते मांडता यावे. धनिक वर्गांकडून कष्टकऱ्यांचे होणारे शोषण या प्रक्रियेद्वारा थांबवावे व विषमता आणि तिच्या आधारे केला जाणारा अन्याय नष्ट करावा, हा लोकशाही समाजवादाचा आशय ते तरूण पिढीला समजावून सांगत. तसेच आर्थिक व सामाजिक समता ही लोकशाहीच्या मार्गाने घडवून आणली पाहिजे, तरच समाजवादी, लोकशाही निर्माण होईल या विषयी ही ते तरूणांना मार्गदर्शन करत होते. ना. ग. गोरे केवळ पोथीनिष्ठ, तर्कनिष्ठ विचारवंतच नाहीत, त्याला कृतिनिष्ठेची धारही होती. तरूण मंडळी पढीक, कर्मठ पक्षनिष्ठ बनू नये असा ना. ग. गोरेंचा कटाक्ष होता. १२

ना. ग. गोरे यांनी जयप्रकाश नारायण यांच्या 'व्हाय सोशॅलिझम'' या पुस्तकाचा अनुवाद केला. नाशिकच्या तुरूंगात एकत्र कारावास भोगतानाच जयप्रकाश नारायण आणि ना. ग. गोरे हे मित्र झाले. वैचारिक देवाणघेवाणीतून हे स्नेहसंबंध अधिक दृढ झाले आणि काँग्रेस समाजवादी पक्षाच्या स्थापनेनंतर जयप्रकाशजी यांची वैचारिक भूमिका महाराष्ट्रातील समाजवादी सहकाऱ्यांना आणि समाजवादाबद्दल आकर्षण वाटणाऱ्या तरूणांना स्पष्टपणे समजून देणे आवश्यक आहे,

असे ना. ग. गोरे यांना वाटू लागले. जयप्रकाश नारायण यांनी त्यांच्या पुस्तकात बाबू भगवानदास या मान्यवर व्यक्तीच्या आध्यात्मिक भूमिकेचे बुध्दिप्रामाण्यवादी दृष्टीकोणातून स्पष्टपणे खंडन केले आहे. गोरे यांना हा भाग फार आवडला. आगरकरांच्या विचारांच्या प्रभावामुळे ते स्वत: बुध्दिप्रामाण्यवादी झाले होते. जयप्रकाश नारायण यांनी असे मत मांडले होते की, ''बाबू भगवानदास यांच्यासारख्या थोर चारित्र्यवान व्यक्तींनी आध्यात्मिक भूमिका मांडली की समाजात तिला मान्यता मिळते आणि नंतर समाजाचे शोषण करणारे या भूमिकेच्या आधारे त्यांचा स्वार्थ साधतात म्हणून राजकारण हे बुध्दिप्रामाण्यवादी भूमिकेवरच आधारलेले असले पाहिजे.'' ना. ग. गोरे यांचा हाच दृष्टिकोण असल्यामुळे जयप्रकाश नारायण यांच्या पुस्तकाचा अनुवाद करताना त्यांना समाधान वाटले. जयप्रकाश नारायण यांनी त्यांच्या पुस्तकात आपल्या समाजातील दारिद्रय आणि विषमता यांचे भेदक वर्णन केले असून समाज्वादी समाजरचनेमुळेच या दारिद्रयाचे व विषमतेचे निर्मूलन होईल असे आग्रहाने मांडले होते. केवळ राजकीय स्वातंत्र्य पुरेसे नाही, तर सामाजिक व आर्थिक न्याय आणि समता प्रस्थापित झाली पाहिजे असे ना.ग.गोरे व जयप्रकाश नारायण यांना वाटत होते. त्या दृष्टीने ते प्रभावीपणे समर्पण करत होते. जयप्रकाशजी आणि गोरे या दोघांची अशी वैचारिक आणि मानसिक एकरूपता झाल्यामुळे 'व्हाय सोशालिझम' या पुस्तकाचा गोरे यांनी केलेला 'समाजवादच का ?' हा अनुवाद महत्त्वाचा आहे.

१९३५-३६ च्या सुमारास विनायकराव कुलकर्णी, बंडू गोरे, अण्णा साने, गंगाधर ओगले आदी तरूणांच्या गटाला स्वातंत्र्य लढ्याबद्दल आणि समाजवादाबद्दल आकर्षण वाटू लागले होते. ते तरूण स्वाभाविकपणेच एस.एम.जोशी आणि ना.ग.गोरे यांच्या समवेत काम करू लागले. त्यावेळी त्या सर्वांनी प्रथम 'समाजवादच का ?'

या पुस्तकाचे वाचन केले. महाराष्ट्रात समाजवादाबद्दल उत्सुकता असणाऱ्या अनेकांनी हे पुस्तक वाचले. पुढे १९३९-४० साली समाजवादी पक्षातर्फे अभ्यासवर्ग सुरू झाल्यानंतर आचार्य जावडेकरांचे 'आधुनिक भारत' आणि ना. ग. गोरे यांनी केलेला जयप्रकाश नारायण यांच्या पुस्तकाचा 'समाजवादच का ?' हा अनुवाद ही दोन पुस्तके अभ्यासवर्गाला येणारे महाविद्यालयीन विद्यार्थी आणि अन्य तरूण यांना प्रथम वाचावयास दिली जात आणि नंतर या दोन पुस्तकांच्या आधारे ना.ग.गोरे, एस.एम. आणि पा.वा. गाडगीळ हे त्या तरूणांच्या गटाची बौध्दिके घेत असत.

य. गो. जोशी यांच्या वादविवेचनमालेत पा.वा.गाडगीळ यांनी लिहिलेली 'सुलभ समाजवाद' आणि 'फॅसिझम' ही पहिली दोन पुस्तके प्रसिध्द झाली. या मालेतील तिसरे पुष्प 'साम्राज्यशाही' हे ना.ग.गोरे यांनी गुंफले. भारतावर पूर्वी आक्रमणे झ ली तेव्हा बहुतेक सर्व आक्रमक लुटालूट, कत्तली करून परत गेले. बाबराने आपले राज्य येथे स्थापले आणि तो आणि त्यांचे वंशज येथेच राहिले. आक्रमकांनी आणि जेत्यांनी जुलूम केले, अत्याचार केले, मात्र भारतातील ग्रामीण समाजरचना पूर्वी होती तशीच राहिली. ब्रिटिश साम्राज्य येथे आल्यावर ही समाजरचनाच त्यांनी उद्‌धवस्त केली. पूर्वी भारतातून कापड निर्यात होत होते परंतु ब्रिटीशांनी येथील विणकरांचा उद्योग नष्ट करून भारताने इंग्लडला शेतीतील कापूस हा कच्चा माल पुरवायचा आणि इंग्लडचे कापड आयात करावयाचे अशी व्यवस्था केली. जंगलाच्या आधारे जगणाऱ्या आदिवासींची जंगलाची मालकीच ब्रिटीशांनी हिसकावून घेतली. ब्रिटीश राजवटीत येथील कारागीर मजूर बनला. आदिवासी जंगलाचा राजा राहिला नाही म्हणजे आधुनिक काळातील साम्राज्यशाही पूर्वीच्या आक्रमकांच्यपेक्षा वेगळी, अत्यंत निर्घृण आहे आणि या साम्राज्यामुळे सर्व भारतीय गुलाम बनले आहेत हे ना. ग. गोरे यांनी 'साम्राज्यशाही' या पुस्तकात मांडले आहे.

ना. ग. गोरेंनी या पुस्तकामध्ये, 'भारतासारख्या गुलाम राष्ट्रांनी साम्राज्यशाहीशी संघर्ष करून आपले स्वातंत्र्य प्राप्त करून घेतले पाहिजे आणि स्वातंत्र्य मिळाल्यावर साम्राज्यशाहीला कारणीभूत होणारी भांडवलशाही उत्पादनव्यवस्था आपल्या देशांतून नष्ट केली पाहींजे' हा विचार मांडला.

ना. ग. गोरे यांनी मार्क्स, एंगल्स यांचे कम्युनिस्ट मॅनिफेस्टो, एंगल्स यांनी लिहिलेला 'सोशॅलिझम - सायंटिफिक अॅन्ड युरोपियन' हा ग्रंथ तसेच मार्क्स, लेनिन यांच्या अन्य लेखनाच्या मुख्यत: आधारे 'विश्वकुटूंबवाद' हे पुस्तक लिहिले. या पुस्तकांत ना. ग. गोरे यांनी मार्क्स आणि एंगल्स यांच्या सिध्दांताचा आशय स्पष्ट केला आहे. मार्क्सने मांडलेल्या श्रमांच्या अतिरिक्त मूल्याच्या सिध्दांताचे स्पष्टिकरण गोरे यांनी दिले आहे.

ना. ग. गोरे यांनी 'साम्राज्यशाही' या पुस्तकांत यंत्रयुगापूर्वीची आक्रमणे आणि नवीन साम्राज्यशाह्यांची आक्रमणे यातील फरक दाखविताना आधुनिक साम्राज्यशाहीमध्ये राजकीय सत्तेचे आक्रमण होत असतानाच त्या सत्तेला पाठिंबा देणाऱ्या भांडवलशाहीने अर्थबळाच्या जोरावर भारतासारख्या जित राष्ट्रांतील उद्योग नष्ट करून, शेतीचीही धूळधाण कशी केली, हे ना.ग.गोरे यांनी स्पष्टपणे मांडले आहे.१३

देशांत समाजवादी अर्थव्यवस्था प्रस्थापित करणे, जमीन सुधारणाविषयक कायद्यांत सुधारण करणे, भूमिहीनांना जमीन मिळवून देणे, मोठ्या उद्योगधंद्याचे राष्ट्रीयीकरण करणे, राजकीय व आर्थिक सत्तेचे विकेंद्रिकरण करणे, धर्मनिरपेक्षता सहजीवन या तत्त्वांचा पुरस्कार करणे या उद्देशाने समाजवादी पक्षाची स्थापना झाली होती.

स्वांतत्र्यपूर्व काळात काँग्रेस हे राष्ट्रव्यापी व्यासपीठ होते. त्यावेळी काँग्रेसमध्ये राहून विविध मतांच्या लोकांना आपल्या गटाचे अस्तित्व उघडपणे ठेवता येत होते. काँग्रेस समाजवादी पक्ष हा काँग्रेस अंतर्गत उपपक्ष होता. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर काँग्रेसच्या घटनेत बदल करण्यात आला. पक्षांतर्गत गटांना आपले स्वतंत्र अस्तित्व ठेवता येणार नाही असा नवा नियम करण्यात आला. त्यावेळी काँग्रेसमधून बाहेर पडावयाचे की नाही हा समाजवाद्यांसमोर प्रश्न होता. ना. ग. गोरेंच्या मते, काँग्रेस ही आमची मातृसंस्था होती. काँग्रेसमध्ये राहून, काँग्रेसच्या झेंड्याखाली उभे राहून आम्ही स्वातंत्र्यासाठी लढलो, त्यामुळे काँग्रेस सोडताना मनाला त्रास होणारच परंतु राजकीय काम नेटाने करावयाचे असेल तर त्या कामाला वैचारिक अधिष्ठान असावे लागते. 'समाजवाद' या विचारांमुळे एकत्र आलेल्या आम्हां कार्यकर्त्यांना या विचारावर अधिष्ठित असलेला पक्ष असणे आवश्यक वाटते. काँग्रेस हा अशी निष्ठा असलेला पक्ष नाही. त्यामुळे काँग्रेसमधून बाहेर पडून अपरिहार्य आहे. सुस्पष्ट विचारांचा पाया असलेल्या पक्षाची बांधणी करावयाची अशा निर्णयाप्रत आल्यावर अन्य समाजवादी मित्रांसमवेत ना. ग. गोरे काँग्रेसच्या बाहेर पडले. हा निर्णय घेण्यापूर्वी समाजवादी पक्षांमध्ये बरेच दिवस चर्चा चालू होती. अशा वेळी पूर्ण विचाराअंती निर्णय घ्यावा व त्याची कार्यवाही करण्यासाठी विचाराशी बांधिलकी स्वीकारावी अशी ना.ग.गोरेंची भूमिका होती. काँग्रेसमधून बाहेर पडून समाजवादी पक्षाची स्थापना करावी असे मत त्यांनी चर्चेत मांडले. बहुसंख्य समाजवादी कार्यकर्त्यांनी हीच भूमिका मांडली, आणि मे १९४८ मध्ये नाशिक येथील अधिवेशनात समाजवादी पक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. १४

सन १९४७ च्या सूरूवातीस युध्दकाळानंतरचे समाजवादी पक्षाचे पहिले अधिवेशन कानपूर येथे भरले. या अधिवेशनात हुकूमशाही मार्गाने जाणारा साम्यवाद

व लोकशाही समाजवाद यांमधील भेद स्पष्ट करण्यात आला व लोकशाहीशिवाय समाजवाद अस्तित्वात येऊ शकत नाही, अशी ग्वाही देण्यात आली. यानंतर मार्च १९४८ मध्ये नाशिक येथील अधिवेशनात काँग्रेसमधून बाहेर पडून स्वतंत्रपणे काम करू लागण्याचा महत्त्वाचा निर्णय पक्षाने घेतला. गांधीजींची हत्या झाल्यानंतर समाजवादी पक्ष व काँग्रेस यांना जोडणारा महत्त्वाचा दुवा नाहीसा झाला. फेब्रुवारी १९४८ मध्ये तर काँग्रेसने आपल्या घटनेत बदल करुन काँग्रेसच्या अंतर्गत उपपक्षांची संघटना करण्यास प्रतिबंध केला. काँग्रेसमध्ये आपले मताधिक्य करावे असे बळ काँग्रेस समाजवादी पक्षात नव्हते. काँग्रेसमधील क्रांतिकारकता कमी होऊन ती उजव्या गटाच्या हातातील एक प्रतिगामी शक्ती होऊन बसणार असा धोका समाजवादी पक्षाच्या लोकांना वाटू लागला होता. बाहेर राहून कार्य केल्यास लोकशाहीला पोषक असा एक विरोधी पक्षही भारतात कार्य करू लागेल अशीही अपेक्षा होती. असा पक्ष उभा होण्यास मदत व्हावी म्हणून फक्त निवडक लोकांनाच पक्षाचे सभासद होता येईल ही भूमिका बदलून लोकशाही समाजवादावर विश्वास असणारा कोणीही मनुष्य चार आणे भरुन पक्षाचा सभासद होऊ शकेल असे पाटणा येथील मार्च १९४९ च्या अधिवेशनात ठरविण्यात आले. मजूर, किसान, युवक, महिला व सहकारी संघ अशा संघटनानाही सांघिक सदस्यत्व घेता येईल अशी घटतेन तरतूद करण्यात आली.

नाशिक अधिवेशनासपासूनच भारतीय समाजवादात एक नवीन वेगळा वैचारिक प्रवाह सुरु झाला असे म्हणता येईल. जयप्रकाश नारायण आणि त्यांच्या सहकाऱ्यांची मार्क्सवादावर श्रध्दा होती. 'राज्ययंत्र हस्तगत केल्याखेरीज जगातील कोणताही पक्ष समाजवाद अस्तित्वात आणू शकणार नाही.' असे आग्रहपूर्वक प्रतिपादन

जयप्रकाशजींनी आपल्या 'समाजवाद का ?' या निबंधात केले होते. परंतु नाशिक अधिवेशनाला त्यांनी जो अहवाल सादर केला, त्यात त्यांच्या विचारांची बदलती दिशा आढळून आली. त्यांचे विचार मार्क्सवादापासून दूर होवू लागले होते. साधनशुचितेचा आग्रह धरला नाही तर, समाजहिताचे मंगल साध्य कधीही हाती लागणार नाही, ही गांधीजींची शिकवण जयप्रकाशजी व त्यांच्या सहकारी मित्रांना पटू लागलेली होती. क्रांती करावयाची असेल तर राज्ययंत्रच हस्तगत केले पाहिजे, या सिध्दांतावरील त्यांचा विश्वास उडाला आर्थिक विषमता हीच सर्व दुःखाची जननी आहे असे नव्हे, कारण तसे असते तर भारताची फाळणी होण्याचे कारणच नव्हते. म्हणून सर्व गोष्टींचे मूळ केवळ, आर्थिक कारणात शोधण्याचा आपला दुराग्रह समाजवादी पक्षातील कार्यकर्त्यांनी सोडला पाहिजे. १५

स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी समाजवादी पक्ष काँग्रेसमध्ये राहून १९४२ च्या स्वातंत्र्य संग्रामात धडाडीने लढला. त्यावेळी काँग्रेस हे देशव्यापी व्यासपीठ होते. या व्यासपीठावर विविध मतांचे वेगवेगळे हितसंबंध असलेले पक्ष, संघटना, व्यक्ती एकत्र येऊ शकत होत्या. परंतु स्वातंत्र्य प्राप्तीनंतर काँग्रेसने पक्षाची घटना बदलून काँग्रेस पक्षाच्या अंतर्गत अन्य पक्षाचे अस्तित्व असणार नाही, अशी तरतूद केली. म्हणजेच यापुढे काँग्रेस समाजवादी पक्षाला स्वतंत्र अस्तित्व ठेवता येणार नाही, हे स्पष्ट झाले. या परिस्थितीत काय करावयाचे यासंबंधी काँग्रेस समाजवादी पक्षाच्या कार्यकारिणीत आणि देशातील समाजवादी कार्यकर्त्यांमध्ये चर्चा झाली. अखेर काँग्रेसमधून बाहेर पडून स्वतंत्रपणे राजकीय कार्य करण्याचा आणि जनतेच्या न्याय हक्कांसाठी व मार्गांसाठी काम करण्याचा निर्णय समाजवादी पक्षाने घेतला. १९४८ साली नाशिक येथे समाजवादी पक्षाचे अखिल भारतीय अधिवेशन भरले. आणि त्या अधिवेशनात काँग्रेसमधून बाहेर पडण्याचा ठराव सर्वांच्या संमतीने मंजूर करण्यात आला. ज्यांना

हा निर्णय मान्य नव्हता, असे संपूर्णानंदांच्यासारखे नेते या अधिवेशनास आलेच नाहीत. जयप्रकाश नारायण हे सोशालिस्ट पार्टीचे सरचिटणीस झाले. विभागीय चिटणीसामध्ये ना.ग. गोरे यांची पश्चिम विभागासाठी नियुक्ती करण्यात आली. १९४७ च्या १५ ऑगस्टपासून समाजवादी पक्षाच्या महाराष्ट्र शाखेने 'जनवाणी' हे मराठी साप्ताहिक सुरु केले. ना. ग. गोरे हे त्याचे संपादक होते.

१९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यात समाजवादी नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी भूमिगत चळवळीत केलेल्या कामामुळे तरूणांना स्वाभाविकपणेच या नेत्यांबद्दल व कार्यकर्त्यांबद्दल आदर आणि प्रेम वाटत होते. राष्ट्रसेवादलातील अनेक कार्यकर्त्यांनी स्वातंत्र्यलढ्यात धडाडीने काम केले होते. १९४२ साली जे विद्यार्थी हायस्कूलमध्ये शिकत होते, त्यांना त्यावेळी लहान वयामुळे चळवळीत प्रत्यक्ष काम करणे शक्य नव्हते. तरी त्यांना स्वातंत्र्य चळवळीबद्दल म. गांधी, पं. नेहरू, सुभाषचंद्र बोस आदी नेत्यांबद्दल आकर्षण वाटत होते. ते तरुण राष्ट्र सेवादल आणि समाजवादी पक्ष याकडे आकृष्ट झाले. एस. एम. जोशी हे सेवादलाचे प्रमुख होते. त्यांच्या नेतृत्वाखाली सातारा येथे फेब्रुवारी १९४७ साली राष्ट्र सेवादलाच्या दहा हजाराहून अधिक सैनिकांचा मेळावा भरला होता. ना.ग. गोरे, शिरूभाऊ लिमये, अच्युतराव पटवर्धन आदी समाजवादी नेतेही या मेळाव्याला हजर होते, सेवादलातील या सैनिकांचे राजकीय शिक्षण करुन स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आता नवसमाजनिर्मितीचे कार्य कसे करावयाचे यासंबंधी त्यांना मार्गदर्शन करावयाचे असे राष्ट्र सेवादलाने आणि समाजवादी पक्षानेही ठरविले एस.एम जोशी, साने गुरुजी, ना. ग. गोरे आदींनी यासाठी अनेक शिबीरातून बौध्दिके घेतली. हे नेते महाराष्ट्रभर सतत संचार करीत होते आणि तरुण त्यांचे विचार ऐकण्यास उत्सुक होते. कठीण प्रश्न उपस्थित झाले की, समाजवादी पक्ष त्यांच्यावर खंबीर भूमिका घेऊन सत्याग्रह करीत असे.

स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी संस्थाने भारतात विलीन झाली. त्यांचे प्रतिनिधी लोकसभेवर व विधानसभेत नियुक्त करण्यात आले. त्यांच्यापैकी बहुसंख्य प्रतिनिधी पूर्वीच्या संस्थानांमध्ये अधिकाराच्या जागांवर होते. समाजवादी पक्षाने याला विरोध केला आणि यां प्रतिनिधींची लोकशाही पध्दतीने निवडणूक व्हावी या मागणीसाठी सत्याग्रह करण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणे ना. ग. गोरे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील विविध संस्थानातून आलेल्या तीस तरूण कार्यकर्त्यांनी पुण्यामध्ये सत्याग्रह केला आणि त्यांना दोन महिन्यांची शिक्षा झाली. जेलमध्ये ना. ग. गोरे वरचा वर्ग न स्वीकारता या कार्यकर्त्यांच्या समवेत राहिले. त्यांनी या कार्यकर्त्यांची तुरुंगात बौध्दिके घेतली, त्यांच्याकडून 'आधुनिक भारत' सारख्या ग्रंथांचे वाचनही करून घेतले. यावेळी ना. ग. गोरे यांच्या समवेत असलेले सावंतवाडीचे तरूण कार्यकर्ते जयानंद मठकर यांनी एका लेखात लिहिले आहे, 'मी सत्याग्रह केला त्यावेळी केवळ एक उत्साही तरूण होतो. परंतु ना. ग. गोरे यांनी जे आमचे सर्व तरूण कार्यकर्त्यांचे शिक्षण घेतले. त्यामुळे माझ्या विचारांना दिशा मिळाली आणि मी पुढे आयुष्यभर समाजवादी पक्षात कार्य केले.' ना. ग. गोरे हे उत्तम शिक्षक होते. ते या तरूण कार्यकर्त्यांना टिपणे कशी काढावयाची हे ही शिकवीत. ना. ग. गोरे यांचे नाव समाजवादी पक्षात, सेवादलात आणि समाजातही रुढ झाले. ना. ग. गोरे, एस.एम. जोशी आणि साने गुरुजी यांनी १९४६ ते १९५१ या पाच वर्षांमध्ये भाषणे, बौध्दिके, चर्चासत्रे यांच्याद्वारा जे प्रबोधन केले आणि आर्थिक व सामाजिक समतेचे जे विचार समर्थपणे मांडले त्यांचा फार मोठा संस्कार महाराष्ट्रातील तरूण कार्यकर्त्यांवर झाला. त्यांनी समाजवादी लोकशाही हे विचार सांगतानाच भारतीय समाजजीवन आमूलाग्र बदलण्यासाठी संघर्ष कसा करावा लागेल याचाही दृष्टिकोण दिला.

'जनवाणी' साप्ताहिकातील ना. ग. गोरे यांचे अग्रलेख मार्मिक आणि प्रभावी असत. महात्मा गांधींच्या हत्येनंतर ना. ग. गोरे यांनी महाराष्ट्रात हिंदुत्ववाद्यांनी केलेला विषारी प्रचार आणि त्याविरुध्द बहुजन समाजाची झालेली तीव्र प्रतिक्रीया यावर जो अग्रलेख लिहिला त्यामुळे हिंदुत्ववादी त्यांच्यावर अतिशय संतप्त झाले. ना. ग. गोरेंनी हे टीकेचे आघात धैर्याने सहन केले. १६

पहिल्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी म्हणून समाजवादी पक्षाची भूमिका सांगणारा कार्यक्रम जुलै १९५१ मध्ये स्वीकारण्यात आला. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या काळात अपेक्षेच्या मानाने काँग्रेसने केलेले कार्य किती अपुरे आहे, हे मांडल्यानंतर समाजवादी कार्यक्रम स्पष्ट करण्यात आलेला आहे. त्यातील मुख्य सूत्र असे -

१) भूसमस्या सोडविण्यावर मुख्य भर राहिल. अन्नधान्याचे उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न केले जातील. जमिनदारी पध्दतीचे उच्चाटन करण्यात येईल. त्यासाठी मोबदला देण्यात येणार नाही. उपजीविकेचा संपूर्ण आधार तुटू नये, एवढ्यापुरताच मोबदला फार तर दिला जाईल जमीन कसणाऱ्यांना संरक्षण मिळेल. कोणाच्याही कुटुंबाकडे ३० एकराहून अधिक जमीन राहू दिली जाणार नाही. सहकारी शेतीच्या प्रयत्नांना प्रोत्साहन दिले जाईल, जी नवीन जमीन लागवडीखाली आणली जाईल, तिच्या बाबतीत सामुहिक शेतीची व्यवस्था करण्यात येईल. शेतीवर ज्यांना पुरेसे काम मिळू शकत नाही, अशा लोकांच्यासाठी ग्रामोद्योगांना उत्तेजन देण्यात येईल व सार्वजनिक कामे काढून त्यात त्यांना काम देण्यात येईल.

२) उद्योगधंद्याचे तीन विभाग करण्यात येतील. एक राष्ट्रीयीकरण केलेले मोठे उद्योगधंदे मध्यम आकाराचे खाजगी उद्योगधंदे व सहकारी तत्वावर चालविण्यात येणारे छोटे उद्योगधंदे, बँका, विमाव्यवस्था कापड, साखर, सिमेंट, वीज उत्पादन,

प्रमुख रसायने, रेल्वे, मोटार वाहतुक, खाणी व चहा-कॉफी आदींचे मळे यांचे राष्ट्रीयीकरण होईल. राष्ट्राच्या ताब्यात आलेले उद्योगधंदे प्रादेशिक मंडळे स्थापन करुन किंवा स्थानिक स्वराज्य संस्थाच्यामार्फत चालविण्यात येईल. खाजगी व सरकारी अशा दोन्ही अर्थक्षेत्रांतील उद्योगधंदे चालविताना मजूरांना चालक मंडळात स्थान राहिल. मजूरांना जीवनमानाची सुरक्षितता प्राप्त करुन देण्यासाठी अनेकविध कार्यक्रम हाती घेण्यात येईल. किमान उत्पन्न मासिक १०० रुपयांहुन कमी असू नये व १००० रुपयांहुन अधिक हि असू नये. या दिशेने प्रयत्न करण्यात येतील राष्ट्रीयीकरण करताना द्यावयास लागणारी रक्कम संपत्तीवर पट्टी बसवून वसूल करण्यात येईल. पाच लाखाच्या संपत्तीवर २० टक्के या प्रमाणात सुरुवात करुन ही पट्टी १ कोटी रुपयांच्या संपत्तीवर ९० टक्के या प्रमाणापर्यंत वाढविण्यात येईल.

३) राज्यसंस्थेची उभारणी चौखांबी असेल. खेडेगांव, जिल्हा, राज्य व संघराज्य असे हे चार खांब असतील. या व्यवस्थेत ग्रामपंचायतीला महत्त्वाचे स्थान राहिल. ग्रामपंचायतीचे सभासद ग्रामीण लोक निवडून देतील. राष्ट्राच्या नियोजीत उत्पादनात आपल्या गावाने कसा भाग घ्यावा हे ग्रामपंचायत ठरवील व उत्पादनाचे आखून दिलेले उच्चांक साध्य करण्याचा प्रयत्न करील.

या कार्यक्रमावर समाजवादी पक्षाने निवडणूक लढविली. घटना समितीने मंजूर केलेल्या राज्यघटनेनुसार २६ जानेवारी १९५० ला भारत सार्वभौम प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून अस्तित्वात आल्यानंतर १९५२ मध्ये पहिल्या सार्वत्रिक निवडणूका घेण्यात आल्या. या निवडणूकामध्ये काँग्रेसला लोकसभेत आणि सर्व राज्यांमध्ये प्रचंड बहुमत मिळाले. पं. नेहरूंची लोकप्रियता आणि स्वातंत्र्यलढा हा काँग्रेसच्या नेतृत्वाखाली लढला गेला होता. या वस्तुस्थितीचा जनमाणसावरील प्रभावामुळेच

काँग्रेस पक्षाला घवघवीत यश मिळाले. समाजवादी पक्षाचा पराभव झाला. या निवडणूकीत एस. एम. जोशी हे पुणे लोकसभा मतदार संघातून आणि ना. ग. गोरे हे रत्नागिरी लोकसभा मतदार संघातून निवडणूकीस उभे होते. हे दोघेही समाजवादी नेते पराभूत झाले. समाजवादी पक्षाच्या देशभरातील पराभवासंबंधी गोरे यांनी 'जनवाणीत' अग्रलेख लिहिताना समाजवादी पक्षाला आपल्या राजकीय ताकदीचा अंदाज आला नव्हता, अशी प्रांजळ कबुली दिली. त्याचप्रमाणे समाजवादी पक्षाने संघटनेकडे पुरेसे लक्ष दिले नव्हते, हेही मान्य केले. कम्युनिस्ट पक्षात कार्यकर्त्यांचे राजकीय शिक्षण आणि पक्षाच्या आदेशानुसार त्याने शिस्तबध्दपणे करावयाचे कार्य यावर भर दिला जात असल्यामुळेच त्या पक्षाने काही मतदार संघात मजबूत पाय रोवले आहेत आणि त्यामुळेच त्यांनी तेथे विजय संपादन केला आहे, याकडे ना. ग. गोरे यांनी लक्ष वेधले असून समाजवादी पक्षातील क्रियाशील कार्यकर्त्यांचे असे गट बांधण्याची आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली.

१९५२ च्या निवडणूकीत समाजवादी पक्षाचा पराभव झाला तरी या पक्षामध्ये अनेक बुध्दिमान नेते आणि कार्यकर्ते आहेत याची जाणीव पं. नेहरुंना होती म्हणून त्यांनी जयप्रकाश नारायण यांना मंत्रिमंडळात येण्यासाठी १९५३ मध्ये आवाहन केले. परंतु काँग्रेस जोपर्यंत तातडीने समाजवादी कार्यक्रम स्वीकारत नाही तोपर्यंत मंत्रिमंडळात जाणे अगर काँग्रेसशी सहकार्य करणे आत्मघातकी ठरेल. अशी भूमिका डॉ. राममनोहर लोहिया यांनी घेतल्यामुळे पं. नेहरुंच्या आवाहनास प्रतिसाद मिळाला नाही. १९५३ सालानंतर समाजवादी पक्षात मतभेदांना सुरुवात झाली. डॉ. राममनोहर लोहिया व त्यांचे सहकारी कार्यकर्ते पक्षातून बाहेर पडले. कृपलानींच्या कृषक मजदूर पक्षाबरोबर समाजवादी पक्षाचे एकीकरण होऊन प्रजासमाजवादी पक्ष अस्तित्वात आला. याच सुमारास आचार्य विनोबा भावे यांनी भूदान आंदोलन सुरु

केले. जयप्रकाश नारायण यांना या आंदोलनामुळे भारतातील जमीन वाटपाची समस्या सुटू शकेल आणि भूमिहीन शेतमजुरांना व दलितांना जमीन मिळू शकेल, असे वाटत होते. त्याचप्रमाणे जयप्रकाश नारायण यांना असेही वाटू लागले की राजकीय पक्ष हे समाजपरिवर्तनाचे साधन होऊ शकणार नाहीत पाटणा येथे भरलेल्या सर्वोदय कार्यकर्त्यांच्या संमेलनामध्ये जयप्रकाश नारायण यांनी भूदानासाठी जीवनदान करण्याचे जाहीर केले आणि समाजवादी पक्ष सोडला. एस. एम. जोशी आणि ना. ग. गोरे यामुळे फार व्यथित झाले.

ना. ग. गोरे यांच्या मते, भारतातील जमिनीचा प्रश्न 'कसणाराची जमिन' हे तत्त्व स्वीकारले गेले. तरच न्याय्यरितीने सुटू शकेल. उत्तरप्रदेश, बिहार तसेच आंध्र आदी राज्यांमध्ये मोठे जमिनदार आहेत आणि कसलेही कष्ट न करता ते या जमिनीतून कुळांच्या कष्टाने निर्माण झालेल्या उत्पन्नाचा मोठा भाग स्वत:कडेच ठेवीत आहेत. जमिनदारी नष्ट करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला असला, तरी अनेक राज्य सरकाराच्या वर येथील जमिनदार वर्गांचाच प्रभाव असल्यामुळे केंद्राचा निर्णय डावलून तेथील जमिनदारांचा पूर्वी चालू असलेला जुलूम चालू होता. या जुलूमाविरुध्द १९४८ मध्ये तेलंगणातील कम्युनिस्ट पक्षाने शेतकऱ्यांना न्याय मिळावा यासाठी सशस्त्र आंदोलन केले, परंतु ते सरकारने मोडून काढले. अशा परिस्थितीत जमिनीचा प्रश्न सुटावा आणि भूमिहीन शेतमजुरांना व दलितांना जमीन मिळावी म्हणून आचार्य विनोबा भावे यांनी जे भूदान आंदोलन सुरु केले ते अभिनव होते असे ना. ग. गोरे यांचे मत होते. परंतु त्यांच्या मते, भूसमस्या सोडविण्याचा तोच एकमेव मार्ग आहे असे त्यांना वाटत नव्हते. या देशातील पुरोगामी राजकीय पक्षांनी शेतकऱ्यांची आंदोलने केली पाहिजेत आणि केंद्र सरकारने कठोर धोरण स्वीकारुन सर्व राज्यांमधील जमीनदारी नष्ट होण्यासाठी राज्यांना तसे कायदे

करण्यास व त्याची अंमलबजावणी करण्यास भाग पाडले पाहिजे असे ना. ग. गोरे यांना वाटत होते. केंद्रीय सत्ता काँग्रेसच्या हातात होती. बहूतेक राज्यात काँग्रेसची सत्ता होती. नेहरूंनाही जमिनदारी नष्ट व्हावी असे वाटत होते. परंतु काँग्रेसवर धनिक वर्ग आणि जमिनदारांचा प्रभाव जास्त होता. म्हणून भूमी समस्या सोडविण्यासाठी विनोबाजींनी भूदान आंदोलनाचा स्वीकारलेला मार्ग ना. ग. गोरे यांना महत्त्वाचा वाटत होता. परंतु या आंदोलनाला मर्यादा आहेत हे त्यांनी स्पष्ट केले. भू-समस्या सोडविण्याचा तो एकमेव मार्ग नाही आणि म्हणून जयप्रकाश नारायण यांनी समाजवादी पक्ष सोडण्याचा जो निर्णय घेतला तो योग्य नाही, असे ना. ग. गोरेंचे मत होते. भारतातील समाजवादी पक्षाचे नेतृत्व करीत असताना त्यांनी भूदानाला पाठिंबा द्यावा. परंतु त्यावेळी समाजवादी पक्षाचे जे कार्यकर्ते देशभर पसरले होते. त्यांचे नेतृत्व करणे ही जयप्रकाशजींची जबाबदारी होती. ना. ग. गोरेंच्या मते, पक्षातील अंतर्गत मतभेद विकोपाला जाऊ न देणे हे केवळ जयप्रकाश नारायण हेच करु शकतात. आचार्य नरेंद्र देव या थोर आणि ज्येष्ठ समाजवादी नेत्यांनी भूदान आंदोलनाच्या मर्यादा स्पष्टपणे मांडल्या होत्या. सरकारने जमिनदारी नष्ट करणारे कायदे करणे आणि शेतकरी व शेतमजूर यांचे हीत करु इच्छिणाऱ्या सर्व राजकीय पक्षांनी व संघटनांनी आंदोलने करुन सरकारला भूमी समस्या सोडविण्यास भाग पाडणे हाच मार्ग शेवटी प्रभावी ठरेल, हे आचार्य नरेंद्र देव यांचे म्हणणे ना. ग. गोरेंना सर्वस्वी योग्य वाटले. म्हणून त्यांनी हीच भूमिका आग्रहाने मांडली.

कार्यकर्त्यांची वैचारिक भूमिका खंबीर व्हावी यासाठी त्यांची बौध्दिके घेत असतानाच ना. ग. गोरे त्यांना सांगत की आपल्या विचारांप्रमाणेच आपण वागले पाहिजे. मुंबईला गिरणी कामगार तरूणांचा एक गट समाजवादी चळवळीत होता. नायगाव भागात राहणारे हे सर्व तरुण रत्नागिरी जिल्ह्यातून आलेले होते. ना. ग.

गोरेंचे भाषण ऐकल्यानंतर हे तरुण त्यांना म्हणाले 'तुम्ही आम्हांला कार्यक्रम द्या' ना. ग. गोरे म्हणाले 'तुम्ही प्रत्येकी दहा रुपये देऊन तुमच्च्यापुरते सहकारी तत्त्वावर रेशनचे दुकान सुरु करा सहकारी चळवळ हा समाजवादी चळवळीचा महत्त्वाचा पैलू आहे. हे स्वस्त धन्याचे दुकान तुम्ही चोखपणे चालवा, पुढचे पाऊल काय टाकायचे तो मार्ग तुम्हाला सापडेल.' ना. ग. गोरेंच्या सांगण्याप्रमाणे त्या तरुणांनी प्रथम रेशनच्या धान्याचे नंतर किराणा मालाचे सहकारी दुकान अशी वाटचाल सुरू केली. त्यातूनच या कार्यकर्त्यांनी 'मुंबई कामगार ग्राहक सहकारी मंडळ' ही संस्था स्थापन केली. त्यातून 'अपना बझार' हे डिपार्टमेंटल स्टोअर उभे राहिले व त्याच्या अनेक शाखा मुंबईच्या आसपास निघाल्या ना. ग. गोरे या कार्यकर्त्यांना नियमाने भेटत, त्यांच्याशी बोलत, राजकीय परिस्थितीबाबत आणि अन्य कामांबद्दल मार्गदर्शन करताना ना. ग. गोरे त्यांना म्हणाले, 'आपली संस्था एक आदर्श सहकारी संस्था बनविणे हे समाज्वादी पक्षाचे काम आहे. विधायक वृत्तीने काम करुन, 'अपना बझार' आदर्श रीतीने चालवून तुम्ही समाजवादी चळवळ संपन्न करीत आहात.'

राष्ट्र सेवादलाने हाती घेतलेला 'साने गुरुजी सेवापथकाचा' कार्यक्रम ना. ग. गोरेंना फार महत्त्वाचा वाटत होता. ते सेवापथकाच्या अनेक केंद्रावर गेले श्रमदान करुन तरुणांच्या विधायक कार्यात ते सहभागी झाले आणि कार्यकर्त्यांशी चर्चा करताना त्यांनी नवनवीन योजनांना पाठिंबा दिला. ग्रामीण पुनर्रचनेच्या कल्पना कार्यकर्त्यांना समजाव्यात म्हणून ना. ग. गोरे यांनी ग्रामसुधारणेच्या कल्पना मांडणारे 'मुरारीचे साळगांव' असे शीर्षक असलेले पुस्तक लिहिले. ना. ग. गोरेंना या पुस्तकाबद्दल शासनाकडून पारितोषिक मिळाले. तेव्हा ना. ग. गोरे म्हणाले, त्यांनी त्यांच्या कल्पनेतील आदर्श गावाचे चित्र या पुस्तकात मांडले आहे. त्यांनी सुचविलेला प्रयोग समाजवादी कार्यकर्त्यांनी पाच गावात जरी यशस्वी करुन

दाखविला तरी त्यांना याचे खरे परितोषिक मिळाल्यासारखे होईल. १७

समाजवादी चळवळीत ना. ग. गोरेंनी अनेक पदे विभूषित केली ते वर्षानुवर्षे राष्ट्रीय कार्यकारिणीचे सभासद होते. पक्ष एकसंघ असताना महाराष्ट्र शाखेच्या सरचिटणीस पदापासून राष्ट्रीय पक्षाच्या सरचिटणीसपदापर्यंत सर्व महत्त्वाच्या पदांवर त्यांची नियुक्ती झाली होती. अनेक वर्षे ते प्रजासमाजवादी पक्षाचे अध्यक्ष होते. संसदेच्या लोकसभा व राज्यसभा या दोन्ही सभागृहात त्यांनी कार्य केले. जनता पार्टीच्या काळात ब्रिटनमध्ये उच्चायुक्त अथवा राजदूत म्हणून त्यांनी काम सांभाळले. भ्रष्टाचाराचा ज्यांना कधीही स्पर्श झाला नाही अशा जुन्या पठडीतल्या चारित्र्यसंपन्न नेत्यांमध्ये त्यांची गणना होते.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर समाजवादी पुढाऱ्यांनी काँग्रेसमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. काँग्रेसच्या नेतृत्वाने काँग्रेसचे राष्ट्रीय आघाडी हे स्वरूप बदलून त्याला पक्षाचे रुप देण्याचे ठरविले. समाजवादी नेत्यांच्यापुढे आपला स्वतंत्र पक्ष बरखास्त करून एक औपचारिक वैचारिक गट म्हणून काँग्रेसमध्ये राहणे अथवा काँग्रेसमधून बाहेर पडणे हे दोनच पर्याय उरले होते. अनौपचारीक वैचारिक गट, स्थानिक व प्रादेशिक निष्ठा व लागेबांधे यांच्यामुळे केव्हाच विखुरला गेला असता. म्हणून पक्ष नेत्यांनी दुसरा पर्याय स्वीकारला. स. का. पाटलंच्या जोखडातून पक्षाला मुक्त करून घेण्याचे वरिष्ठ नेते अशोक मेहता यांना एवढी घाई झाली होती की काँग्रेस सोडण्याचा रितसर निर्णय होण्यापूर्वीच त्यांनी काँग्रेसविरुध्द म्युनिसिपल कॉर्पोरेशनच्या निवडणूका लढविण्याचे ठरविले. त्याबद्दल अनुशासन प्रिय जवाहरलाल नेहरूंनी लोहियांजवळ तीव्र नापसंती व्यक्त केली होती. १९४६ ते ५२ या काळात समाजवादी चळवळीच्या उभारणीसाठी अशोक मेहतांनी मोठे भगीरथ प्रयत्न केले होते.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

ना. ग. गोरेंच्या मते, काँग्रेसमधून बाहेर पडण्याबाबतचा निर्णय योग्य होता. त्या निर्णयानुसार निश्चित वैचारिक भूमिका घेऊन किमान पंचवीस वर्षे काम करावयास हवे होते. त्या वेळेच्या समाजवादी चळवळीचे प्रमुख नेते जयप्रकाश नारायण हे होते. आचार्य नरेंद्र देव, डॉ. लोहिया, अच्युतराव पटवर्धन आणि अशोक मेहता ही आमच्यातील राष्ट्रीय पातळीवरील प्रमुख मंडळी होती. एस.एम.जोशी, ना. ग. गोरे आणि अन्य अनेक जण यांचा या नेत्यांवर पुर्ण विश्वास होता. त्यांच्यापैकी आचार्य नरेंद्र देव आणि डॉ. लोहिया हे अखेरपर्यंत समाजवादी चळवळीत राहीले. पण जयप्रकाश नारायण यांनी १९५६ मध्ये समाजवादी चळवळीतील सहकाऱ्यांना सोडून भूदान चळवळीस वाहून घेतले. अच्युतराव पटवर्धन राजकारणातून निवृत्त झाले. अशोक मेहता यांनी १९५२ च्या निवडणूकीत कार्यकर्त्यांच्या आकांक्षा खूप वाढविल्या आणि निवडणूकीतील पराभवानंतर ते खचूनच गेले. अखेर भारतीय पातळीवर समाजवादी चळवळ संघटित करण्याची ज्यांची मुख्य जबाबदारी होती, त्या नेत्यांनी सातत्याने नेतृत्व करण्याऐवजी अन्य मार्ग स्वीकारल्यामुळे समाजवादी चळवळ दुर्बल झाली. राजकीय चळवळीत सातत्याला फार महत्त्व असते. १९४८ साली समाजवादी पक्षाने बाहेर पडून स्वतंत्रपणे कार्य करण्याचा जेव्हा निर्णय घेतला, तेव्हा ज्येष्ठ नेत्यांनी जी कमिटमेंट स्वीकारली होती, ती त्यांनी दोन तपे तरी पाळावयास हवी होती. ना. ग. गोरेंच्या मते, 'जयप्रकाश नारायण' यांचा जनमनावर फार मोठा प्रभाव होता. १९७३ सालानंतर ज्या वेळी त्यांनी पुन्हा खंबीर राजकीय भूमिका घेतली, तेव्हा देशात नवचैतन्य निर्माण झाले. १९७५ मध्ये इंदिरा गांधीनी आणीबाणी लादून लोकशाहीवर तीव्र आघात केला. तेव्हा जयप्रकाशजींच्या नेतृत्वामुळेच भारतातील जनतेने १९७७ मध्ये लोकशाहीच्या बाजूने स्पष्ट कौल दिला. जयप्रकाशजींचे हे नेतृत्व समाजवादी चळवळीस सतत लाभले असते, तर देशाचे

चित्र वेगळे दिसले असते. १८

काँग्रेसमधून बाहेर पडण्याचे ज्यावेळी ना. ग. गोरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ठरविले त्यावेळी, पुढील अनेक वर्षे या पक्षात एकत्र राहून ते संघटित करण्याची, भारतीय राजकारणात त्या पक्षाला महत्त्वपूर्ण स्थान मिळेल असे काम करण्याची अलिखित प्रतिज्ञा त्या सर्वांनी केली होती. ज्येष्ठ नेत्यांवर विश्वास ठेवून हजारो कार्यकर्ते समाजवादी पक्षात सामील झाले. याचा विचार करून सर्व कार्यकर्त्यांनी व नेत्यांनी एकजुटीने काम करावयास हवे होते. तसे न घडल्यामुळे नेत्यांनी स्वत:शी कार्यकर्त्यांशी आणि ध्येयाशी प्रतारणा केली. अच्युतराव पटवर्धनांनी राजकारणातून संन्यास घेतला आणि जयप्रकाशजींनी भूदान आंदोलनास स्वत:ला वाहून घेतले हे पक्षावर मोठे आघात होते. ना. ग. गोरेंच्या मते, विरोधकांनी जेव्हा आमच्यावर आघात केले तेव्हा त्यांना तोंड दिले. परंतु पक्षातील ज्येष्ठ नेते जेव्हा त्यांना सोडून गेले त्यावेळी ते कोणाला बोल लावणार ? संघर्ष प्रतिपक्षाशी करता येतो, आपल्या सहकाऱ्यांबरोबर वाद घालता येतो. परंतु समाजवादी पक्षातील ज्येष्ठ सहकाऱ्यांनी ती ही संधी दिली नाही. व्यक्तिगत निर्णय घेऊन ते पक्षापासून बाजूला झाले. राजकीय पक्षाचे नेतृत्व करणाऱ्यांनी पक्षातील सहकाऱ्यांशी चर्चा न करता एकतर्फी निर्णय घेणे असमर्थनीय आहे.

समाजवादी पक्षात वादळ झाले ते मुख्यत: अशोक मेहता, आणि डॉ. लोहिया यांच्यातील वैचारिक मतभेदांमुळे अशोक मेहता यांनी 'ज्या देशातील अर्थव्यवस्था अविकसित आणि मागासलेली आहे, त्या देशात सत्तारुढ पक्ष आणि विरोधी पक्ष यांनी एकमताची क्षेत्रे शोधून त्या क्षेत्रांमध्ये एकत्रित काम केले पाहिजे.' असा सिध्दांत मांडला. डॉ. लोहिया यांनी या सिध्दांतास कडाडून विरोध केला. ते

म्हणाले, 'अशोक मेहतांचा सिध्दांत स्वीकारल्यास समाजवादी पक्ष हा कॉंग्रेसला दुरुस्त करु पाहणारा पक्ष होईल. समाजवादी पक्ष हा कॉंग्रेसला पर्याय म्हणून देशापुढे यावयाचा असेल तर आपण तीव्र विरोध केला पाहिजे'. १९

ना. ग. गोरे व एस.एम. जोशी या दोघांनी या संदर्भात त्यांची भूमिका मांडली. त्यांच्या मते, 'अशोक मेहतांचा सिध्दांत त्यांना मान्य नाही. परंतु याबाबत पक्षांतर्गत चर्चा करुन निर्णय घ्यावयास हवा होता. असे न करता स्वतंत्र समाजवादी पक्ष काढण्याचा निर्णय डॉ. लोहिया व त्यांच्या सहकाऱ्यांनी घेतला हे बरोबर नाही'. ना. ग. गोरे यांच्या मते, आमच्या पक्षात वैचारिक मतभेदांप्रमाणेच नेत्यांच्या व्यक्तिमत्त्वांमध्येही संघर्ष झाला आणि त्यामुळे आमच्यात फाटाफूट झाली. २०

१९५२ च्या निवडणूकीत कृषक मजदूर प्रजा पक्षाशी एकत्रीकरण करुन समाजवादी पक्षाने प्रजासमाजवादी पक्ष असे नाव धारण केले. १९५७ मध्ये ना. ग. गोरे संयुक्त महाराष्ट्र समितीमार्फत प्रजासमाजवादी उमेदवार म्हणून पुणे शहरातून लोकसभेवर निवडून गेले. ना. ग. गोरेंनी लोकसभेच्या कार्यावर आपल्या बुध्दिनिष्ठ विचारांची छाप पाडली. समाजवादी शक्ती टिकावी म्हणून प्रयत्न केले. परंतु दुर्देवाने १९६५ मध्ये वाराणसी येथील अधिवेशनात या समाजवादी शक्तीच्या ऐक्याचे विभाजन झाले. त्यातून प्रजासमावादी आणि संयुक्त समाजवादी हे दोन पक्ष वेगळे झाले. ना. ग. गोरेंनी या संकंटाच्या काळात प्रजासमाजवादी पक्षाचे अध्यक्षपद स्वीकारले आणि लोकशाही समाजवाद अखंड टिकावा म्हणून प्रयत्न केले.

महाराष्ट्राने समाजवादी आंदोलनाची पायाभरणी करण्याच्या कामी आणि या आंदोलनाला अधिकाधिक आशय आणि वेग देण्याच्या कामी भरीव कामगीरी केलेली आहे, तरीही समाजवादी आंदोलनाचे महाराष्ट्रातील यश बेतातेच आहे हे मान्य केले

म्हणाले, 'अशोक मेहतांचा सिध्दांत स्वीकारल्यास समाजवादी पक्ष हा काँग्रेसला दुरुस्त करु पाहणारा पक्ष होईल. समाजवादी पक्ष हा काँग्रेसला पर्याय म्हणून देशापुढे यावयाचा असेल तर आपण तीव्र विरोध केला पाहिजे'. १९

ना. ग. गोरे व एस.एम. जोशी या दोघांनी या संदर्भात त्यांची भूमिका मांडली. त्यांच्या मते, 'अशोक मेहतांचा सिध्दांत त्यांना मान्य नाही. परंतु याबाबत पक्षांतर्गत चर्चा करुन निर्णय घ्यावयास हवा होता. असे न करता स्वतंत्र समाजवादी पक्ष काढण्याचा निर्णय डॉ. लोहिया व त्यांच्या सहकाऱ्यांनी घेतला हे बरोबर नाही'. ना. ग. गोरे यांच्या मते, आमच्या पक्षात वैचारिक मतभेदांप्रमाणेच नेत्यांच्या व्यक्तिमत्त्वांमध्येही संघर्ष झाला आणि त्यामुळे आमच्यात फाटाफूट झाली. २०

१९५२ च्या निवडणूकीत कृषक मजदूर प्रजा पक्षाशी एकत्रीकरण करुन समाजवादी पक्षाने प्रजासमाजवादी पक्ष असे नाव धारण केले. १९५७ मध्ये ना. ग. गोरे संयुक्त महाराष्ट्र समितीमार्फत प्रजासमाजवादी उमेदवार म्हणून पुणे शहरातून लोकसभेवर निवडून गेले. ना. ग. गोरेंनी लोकसभेच्या कार्यावर आपल्या बुध्दिनिष्ठ विचारांची छाप पाडली. समाजवादी शक्ती टिकावी म्हणून प्रयत्न केले. परंतु दुर्देवाने १९६५ मध्ये वाराणसी येथील अधिवेशनात या समाजवादी शक्तीच्या ऐक्याचे विभाजन झाले. त्यातून प्रजासमावादी आणि संयुक्त समाजवादी हे दोन पक्ष वेगळे झाले. ना. ग. गोरेंनी या संकटाच्या काळात प्रजासमाजवादी पक्षाचे अध्यक्षपद स्वीकारले आणि लोकशाही समाजवाद अखंड टिकावा म्हणून प्रयत्न केले.

महाराष्ट्राने समाजवादी आंदोलनाची पायाभरणी करण्याच्या कामी आणि या आंदोलनाला अधिकाधिक आशय आणि वेग देण्याच्या कामी भरीव कामगीरी केलेली आहे, तरीही समाजवादी आंदोलनाचे महाराष्ट्रातील यश बेतातेच आहे हे मान्य केले

पाहिजे. या अपयशाचे कारण वेगवेगळे राजकीय पंडित वेगवेगळ्य प्रकारे सांगतात, परंतु या सर्वांनाच एक गोष्ट मान्य करावी लागेल की या आंदोलनाचे नेते आणि शिल्पकार काही वेगळ्याच मातीचे घडलेले आहेत. हे वेगळेपण जसे त्यांच्या चारित्र्याचे आहे, तसेच त्यांच्या विचार संपन्नतेचेही आहे. म्हणून तर यशापयश बाजूला ठेवून ना. ग. गोरे यांच्यासारख्या समाजवादी नेत्यांना महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनात अनन्यसाधारण स्थान प्राप्त झालेले आहे. तरुण पिढीला संस्कारित करण्याचे त्यांच्या विचारांना आचारांना समाजवादी कृतीची जोड देण्याचे काम ना. ग. गोरे यांनी केले, म्हणून सत्तेच्या राजकारणापासून दूर राहून देशसेवा व सामाजिक आर्थिक समता निर्माण करणारी तरूणांची एक फळी त्याकाळात उभी करण्याचे काम ना. ग. गोरे यांनी केले. स्वत: सत्ताभिलाषी नसल्यामुळे ते तरुणांच्या पुढे समाजवादी कार्यकर्ता कसा असावा याचे आदर्श उदाहरण होते. २१

भारतात लोकशाही समाजवादी विचाराचे बीज रूजवण्यात ना. ग. गोरे यांचा समावेश होता. समाजवादी विचार रूजावेत, वाढावेत यासाठी त्यांनी प्रयत्न केले. स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लोकशाही समाजवादी विचार रूजावा म्हणून त्यांनी आयुष्यभर अथक प्रयत्न केले. समाजवादी विचारांचे आणि सामाजिक समतेचे समर्थन करणारे वैचारिक साहित्यही त्यांनी लिहले. लोकशाही समाजवादी चळवळीत त्यांना मोलाचे स्थान आहे. भारतात समाजवादी विचार रूजावेत म्हणून त्यांनी आयुष्यभर कार्य केले. त्याचप्रमाणे स्वातंत्र्योत्तर काळात अंतर्गत ज्या चळवळी झाल्या. त्यामध्ये ना.ग. गोरेंनी सक्रिय सहभाग घेतला. संयुक्त महाराष्ट्र चळवळ, गोवा मुक्ती चळवळ तसेच कामगार चळवळ या तीन चळवळीत त्यांनी भाग घेतला. त्याचा आढावा पुढील प्रकरणात घेणार आहे.

# संदर्भसूची


१. प्रधान ग.प्र. - 'महाराष्ट्राचे शिल्पकार ना. ग. गोरे'
प्रथमावृत्ती १ मे २००६ प्रकाशन महाराष्ट्र राज्य
साहित्य आणि संस्कृती मंडळ पृष्ठ क्र. १६, १७, १८

२. दाभोलकर दे.अ - 'लोकशाही समाजवादी'
संगम प्रकाशन ४५९ नारायण पेठ पृष्ठ क्र. ७९

३. प्रधान ग.प्र. - 'महाराष्ट्राचे शिल्पकार ना. ग. गोरे'
प्रथमावृत्ती १ मे २००६ प्रकाशन महाराष्ट्र राज्य
साहित्य आणि संस्कृती मंडळ पृष्ठ क्र. १८, १९

४. दंडवते मधू - 'नानासाहेबांची राजकीय वाटचाल'
गोरे गौरव संपा - सदानंद वर्दे,
श्री. पु. भागवत मौज प्रकाशन मुंबई पृष्ठ क्र. २०

५. दाभोलकर दे.अ - 'लोकशाही समाजवादी'
संगम प्रकाशन ४५९ नारायण पेठ पृष्ठ क्र. ८२, ८३

६. प्रधान ग.प्र. - 'महाराष्ट्राचे शिल्पकार ना. ग. गोरे'
प्रथमावृत्ती १ मे २००६ प्रकाशन महाराष्ट्र राज्य
साहित्य आणि संस्कृती मंडळ पृष्ठ क्र. १९, २०

७. जोशी एस.एम.- 'मी - अेस् अेम्' आत्मकथा
कॉन्टिनेन्टल प्रकाशन पृष्ठ क्र. २७२

८. सुराणा पन्नालाल - 'लोकशाही समाजवादच का?'
प्रकाशन सचिव एस.एम. जोशी
सोशालिस्ट फाऊंडेशन साने गुरुजी स्मारक सिंहगड
रस्ता पुणे प्रथमावृत्ती जुलै १९९२ पृष्ठ क्र. ११

९. प्रधान ग. प्र - 'नानासाहेब गोरे - एक समर्पित जीवन' साधना ना. ग. गोरे प्रथम स्मृतीदिन अंक १ मे १९९४, प्रकाशन साधना प्रेस, पुणे पृष्ठ क्र. ६

१०. उपरोक्त पृ. क्र. ६

११. दंडवते मधू - 'नानासाहेबांची राजकीय वाटचाल' गोरे गौरव संपा - सदानंद वर्दे, श्री. पु. भागवत मौज प्रकाशन पृष्ठ क्र. २१

१२. तावडे नारायण - 'नारायणाच्या शब्दांत नारायण गोरे गौरव संपा-सदानंद वर्दे श्री. पु. भागवत मौज प्रकाशन मुंबई पृष्ठ ७४

१३. प्रधान ग. प्र. - 'महाराष्ट्राचे शिल्पकार ना. ग. गोरे' प्रथमावृत्ती १ मे २००६ प्रकाशन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ पृष्ठ क्र. २३, २४, २५, २६, २७

१४. प्रधान ग. प्र - 'नानासाहेब गोरे - एक समर्पित जीवन' साधना ना. ग. गोरे प्रथम स्मृतीदिन अंक १ मे १९९४, प्रकाशन साधना प्रेस, पुणे पृष्ठ क्र. ६, ७

१५. दाभोलकर दे.अ - 'लोकशाही समाजवादी' संगम प्रकाशन ४५९ नारायण पेठ पृष्ठ क्र. ८५, ८६, ८८

१६. प्रधान ग. प्र. - 'महाराष्ट्राचे शिल्पकार ना. ग. गोरे' प्रथमावृत्ती १ मे २००६ प्रकाशन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ पृष्ठ क्र. ३८, ३९, ४०, ४१.

१७. प्रधान ग. प्र. - 'महाराष्ट्राचे शिल्पकार ना. ग. गोरे' प्रथमावृत्ती १ मे २००६ प्रकाशन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ पृष्ठ क्र. ४५, ४६, ४७, ४८, ४९, ५०.

१८. लिमये मधु - 'नानासाहेबांचे संयमित जीवन - ना. ग. गोरे श्रध्दांजली अंक १५ जून १९९३ प्रकाशन साधना प्रेस पुणे पृष्ठ क्र. ३५, ३७.

१९. प्रधान ग. प्र - 'नानासाहेब गोरे - एक समर्पित जीवन' साधना ना. ग. गोरे प्रथम स्मृतीदिन अंक १ मे १९९४, प्रकाशन साधना प्रेस, पुणे पृष्ठ क्र. ६

२०. उपरोक्त पृ.क्र. ७

२१. बापट वसंत - 'अक्षर शिल्पांचा शिल्पकार' गोरे गौरव संपा-सदानंद वर्दे श्री. पु. भागवत मौज प्रकाशन मुंबई पृष्ठ क्र. १०७.